# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः08.07.2025** **वारःमंगळवार**

---

राज्यात लवकरच मेगा भरती प्रक्रिया सुरू करण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा

पुरवणी मागण्यांना विधानसभेत मंजुरी

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांकडून केंद्रानं थेट कांदा खरेदी करण्याची राज्याची मागणी

सहकाराच्या माध्यमातून दुधाचा सामायिक ब्रँड निर्माण करण्याची राज्यपालांची सूचना आणि

वेळेपूर्वीच धरणं भरल्यानं विविध जिल्ह्यांमध्ये पूर नियंत्रण

**भरती मुख्यमंत्री**

राज्य शासनानं सर्व विभागांना १५० दिवसांचा उद्दिष्टांचा कार्यक्रम दिला आहे. या कार्यक्रमांतर्गत आकृतीबंध, नियुक्ती नियम सुधारित करणं, अनुकंपा तत्वावरील भरती शंभर टक्के करणं आदी उद्दिष्ट दिली आहेत. या उद्दिष्टपूर्तीनंतर रिक्त पदांची निश्चित माहिती समोर आल्यावर राज्य शासन 'मेगा भरती' करेल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना सांगितलं.

अनुसूचित जमाती प्रवर्गातील रिक्त पदांच्या भरतीबाबत सदस्य भीमराव केराम यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. मागील काळात शासनानं ७५ हजार पदभरतीचा कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार एक लाखांपेक्षा जास्त पदांची भरती करण्यात आली. शासन पदभरतीबाबत कुठेही मागे पुढे पाहणार नाही. अनुसूचित जमाती प्रवर्गातील बिंदूनामावलीनुसार एकही राखीव पद रिक्त ठेवण्यात येणार नाही, असंही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं. ते म्हणाले,

**<u>फडणवीस बाईट – २१ सेकंद</u>**

पुरवणी

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात मांडलेल्या पुरवणी मागण्यांपैकी विविध विभागांच्या पुरवणी मागण्यांना काल झालेल्या चर्चेनंतर विधानसभेत मंजुरी देण्यात आली. यात गृह विभागाच्या ४२१ कोटी ७२ लाख, कृषी विभागाच्या १३२ कोटी ३३ लाख, पशुसंवर्धन विभागाच्या १५ कोटी २० लाख, दुग्धव्यवसाय विभागाच्या ६६ कोटी ४२ लाख, मत्स्यव्यवसाय विभागाच्या १५ कोटी ४१ लाख, उद्योग विभागाच्या ८८ कोटी ६१ लाख, ऊर्जा विभागाच्या ४७ कोटी ६८ लाख, कामगार आणि खनिकर्म विभागाच्या २ कोटी ७३ लाख, तर मराठी भाषा विभागाच्या ४५ लाख ७४ हजार रुपयांच्या पुरवणी मागण्या सभागृहानं आवाजी मतदानानं मंजूर केल्या. तत्पूर्वी संबंधित खात्यांच्या मंत्र्यांनी पुरवणी मागण्यांवर झालेल्या चर्चेला उत्तर दिलं.

**<u>विधेयक</u>**

जिल्हा खनिकर्म प्राधिकरण विधेयक २०२५ विधान परिषदेत काल मंजूर करण्यात आलं. मंत्री शंभुराज देसाई यांनी ते मांडलं होतं.

**<u>कृत्रिम फूलवापर</u>**

राज्यातील फूल उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी कृत्रिम फुलांवर बंदी घालण्यासंदर्भात पर्यावरण मंत्री यांच्यासोबत बैठक घेऊन याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल, असं फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांनी काल विधानसभेत सांगितलं. विधानसभा सदस्य महेश शिंदे यांनी कृत्रिम फुलांच्या अतिरिक्त वापरामुळे सर्व प्रकारच्या फुलांची बाजारपेठ अडचणीत आली असून फूल उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणीसंदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती.

**<u>नार्वेकर</u>**

राज्यात रेशनसाठी पुरवण्यात येणाऱ्या तांदळाच्या खरेदी आणि वितरणात भ्रष्टाचार होत असल्याच्या आरोपाची चौकशी करून अधिवेशन संपण्यापूर्वी तो अहवाल सादर करावा, असे आदेश विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी काल दिले. काँग्रेसच्या नाना पटोले यांनी काही दिवसांपूर्वी हा आरोप केला होता. त्यावरच्या प्रश्नादरम्यान अध्यक्षांनी हे आदेश दिले.

**<u>रेशन</u>**

अन्न धान्य वितरणातील गैरप्रकार टाळले जावेत आणि कारभार सुरळीत व्हावा, याकरीता पुणे शहरासाठी पूर्णवेळ अन्नधान्य वितरण अधिका-याची नेमणूक करण्यात यावी, अशी मागणी आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी काल विधानसभेत केली. अन्न धान्य वितरणाशी संबंधित वेबसाईट सुरळीत चालत नाही आणि ती खूप संथ असते आणि बऱ्याचदा बंदही असते, त्यामुळं नवीन रेशन कार्ड काढणं, त्यामध्ये दुरुस्ती करणं अशी कामं होत नाहीत, अशी माहिती शिरोळे यांनी सभागृहाला दिली. पुणे शहरातील काही रेशन दुकानातून ग्राहकांना सिमेंटमिश्रित गहू आणि तांदूळ वितरीत करण्यात येत असल्याचा प्रकार अलिकडं घडल्याचंही आमदार शिरोळे यांनी नमूद केलं.

**<u>झिरवाळ</u>**

नंदुरबार जिल्ह्यात अन्न आणि औषध प्रशासनानं केलेल्या तपासणीत काही खाद्यतेल नमुने अयोग्य दर्जाचे आढळून आले असून, याप्रकरणी दोषी अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात येणार आहे. तसंच संबंधित कंपनी बंद करण्याची कार्यवाही केली जाईल, अशी माहिती अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी काल विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

**<u>सामंत</u>**

हिन्दी भाषा सक्तीचा पुरस्कार करणारा माशेलकर समितीचा अहवाल महाविकास आघाडीच्या सरकारनं स्वीकारला होता. तो सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल, असं मराठी भाषामंत्री उदय सामंत यांनी काल विधान सभेत सांगितलं.

**<u>कांदा</u>**

मोठया प्रमाणावर कांदा उत्पन्न घेणाऱ्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांकडून केंद्र शासनानं थेट कांदा खरेदी करावा अशी मागणी पणन मंत्री जयकुमार रावल आणि कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी काल केंद्रीय अन्न आणि ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या सोबत झालेल्या बैठकीत केली. देशातील एकंदर कांदा उत्पादनात 55 टक्के वाटा उचलणाऱ्या महाराष्ट्रातील नाशिक, जळगाव, अहमदनगर, पुणे, सोलापूर आणि सांगली जिल्ह्यांना यावर्षी मे महिन्यातील अनियमित पावसामुळं जबरदस्त फटका बसला आहे. कांद्याच्या पिकाचं मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यामुळं शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही वसूल करणं कठीण झालं आहे.

**<u>राज्यपाल</u>**

महाराष्ट्रानं दूध उत्पादनात सहकाराच्या माध्यमातून अमूल, मदर डेअरी प्रमाणे दुधाचा सामायिक ब्रँड निर्माण करावा, अशी सूचना राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केली. आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष तसंच सहकार मंत्रालय स्थापना दिनानिमित्त काल राजभवनात झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. सहकार यशस्वी झाला तरच विकास सर्वसमावेशक होईल, असंही ते म्हणाले.

**<u>सरन्यायाधीश</u>**

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांची भारताच्या सरन्यायाधीशपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा महाराष्ट्र विधान मंडळातर्फे आज विधानभवनात सत्कार करण्यात येणार आहे. यावेळी गवई यांचं भारताची राज्यघटना या विषयावर व्याख्यान होणार आहे.

**<u>मोदी ब्रीक्स</u>**

दहशतवादाचा निषेध ही केवळ सोय नाही तर ती आपली मूल्यप्रणाली असली पाहिजे, असं सांगत महत्त्वाच्या खनिजांचा तसंच तंत्रज्ञान आणि पुरवठा साखळीचा वापर कोणत्याही देशानं स्वार्थासाठी किंवा सशस्त्रीकरणासाठी करु नये, असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ब्राझीलमध्ये रिओ- दि – जानिरो इथं सुरु असलेल्या ब्रिक्स शिखर परिषदेत शांतता आणि सुरक्षितता यावरील सत्रामध्ये ते काल बोलत होते. या परिषदेत ब्रिक्स राष्ट्रांनी सर्व प्रकारच्या दहशतवादाचा सामना करण्यासाठी आपली वचनबद्धता दर्शवली. यावेळी सर्व राष्ट्रांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला. या परिषदेत सुरवातीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहशतवादाचा मुद्दा उपस्थित केला. तात्पुरत्या स्वरुपाचे निर्णय घेण्याऐवजी दूरगामी परिणामाचा विचार करुन निर्णय घेणं गरजेचं आहे, असं ते म्हणाले. ब्रिक्स परिषदेचं अध्यक्षपद पुढच्या वर्षी भारताकडे असणार आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा यंदाच्या परिषदेतला सहभाग आणि ब्राझिल दौरा महत्त्वाचा असल्याचं केंद्रीय आर्थिक व्यवहार विभागाचे सचिव दामू रवी यांनी सांगितलं.

**<u>कोयना</u>**

पूर परिस्थिती टाळण्यासाठी कोयनेच्या पाणी विसर्गाचे आत्तापासून नियोजन करण्याच्या सूचना सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांना काल एका दूरस्थ बैठकीद्वारे दिल्या. कोयना धरणात 65 टक्के पाणी साठा झाला आहे. जुलै आणि ऑगस्ट महिन्यात पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाऊस होतो.

**<u>राधानगरी</u>**

राधानगरी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळं जुलै महिन्यांच्या पहिल्या आठवड्यातच धरण 80 टक्के भरलं आहे. पाणी सात स्वयंचलित दरवाज्यांजवळ पोहोचले आहे. मे महिन्यातच धरणात भरपूर जलसाठा झाल्यानं यंदा प्रथमच धरण लवकर भरलं आहे.

**<u>विसर्ग</u>**

नाशिक शहर परीसरात गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाचा जोर कमी झाला आहे. मात्र धरणातून विसर्ग वाढवण्यात आला आहे. त्यामुळं अनेक गावांचा संपर्क खंडित झाला आहे.

**<u>हवामान</u>**

कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी तर  मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी वीजांसह जोरदार पावसाची शक्यता असल्याचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे. कोकण किनारपट्टीवर सोसाट्याचे वारे वाहतील.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**